**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
**Maharashtra Housing & Area Development Authority**
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१.
दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७, ६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

जावक क्रमांक :- १९ दिनांक :- ०४ जानेवारी, २०२२

प्रसिद्धीपत्रक

# बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प जलद गतीने पूर्ण करणार - गृहनिर्माण मंत्री श्री. जितेंद्र आव्हाड

नायगाव बीडीडी चाळीतील चाळ क्रमांक ५ ब च्या पाडकामाला सुरुवात ; पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला प्रारंभ

मुंबई, दि. ०४ जानेवारी, २०२२ : बीडीडी चाळींच्या प्रत्येक दगडाला इतिहास असून सामाजिक, सांस्कृतिक चळवळीची साक्ष देणाऱ्या या चाळी आहेत. सुमारे शंभर वर्ष जुन्या या चाळींतील इमारतींच्या पुनर्विकासाद्वारे येथील रहिवाशांना सर्व सुविधांयुक्त मोठे घर देऊन त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणेबाबत अनेक वर्षांपासून पाहिलेले स्वप्न आज नायगाव बीडीडी चाळीतील चाळ क्रमांक ५ ब चे पाडकाम सुरु करून प्रत्यक्षात साकारत आहे. सदर चाळ पाडल्यानंतर रिक्त जागी नव्या इमारतींच्या बांधकामाला प्रारंभ करून नायगाव बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पातील पहिल्या टप्प्याला प्रारंभ होत असून बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प लवकरच जलद गतीने पूर्ण करून मार्गी लावला जाईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी आज केले.

मुंबईतील नायगाव बीडीडी चाळीतील चाळ क्रमांक ५ ब आज निष्कासित करून पाडण्याचे काम सुरु करण्यात आले. त्याठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामाला लवकरच प्रारंभ केला जाणार आहे. यावेळी श्री. आव्हाड बोलत होते. श्री. आव्हाड म्हणाले की, आशिया खंडातील नागरी पुनरुत्थानाच्या सर्वात मोठ्या व महाराष्ट्र शासनाचा अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे काम महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरु आहे. या प्रकल्पाकरिता शासनाने म्हाडाची 'सुकाणू अभिकरण' (Nodal Agency) म्हणून नियुक्ती केली आहे. म्हाडातर्फे वरळी, ना. म. जोशी मार्ग - परळ येथील प्रकल्पाच्या कामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून वरळी येथे पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाला प्रारंभही झाला आहे.

नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये प्लॉट ब मधील २३ चाळींचा पुनर्विकास करण्यात येत असून उर्वरित प्लॉट अ मधील १९ चाळींचा पुनर्विकास दुसऱ्या टप्प्यामध्ये केला जाणार आहे. नायगाव बीडीडी चाळीतील पुनर्विकासाच्या टप्पा क्रमांक १ अंतर्गत प्लॉट ब मधील २३ चाळींपैकी चाळ क्रमांक ५ बी, ८ बी व २२ बी मधील १७५ गाळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालय विभागास सेवानिवासस्थान म्हणून देण्यात आले होते. सदर सेवानिवासस्थान गाळ्यांमधील रहिवाशांना नायगांव येथील बॉम्बे डाईंग या संक्रमण शिबिरामधील २२५ चौरस फूट चटई क्षेत्रफळाच्या गाळ्यांचा ताबा म्हाडातर्फे देण्यात आला आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या

के.ई.एम. रुग्णालयाने येथील १७५ कर्मचाऱ्यांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित करून चाळ ५ बी, ८ बी व २२ बी रिक्त करून दिली आहे. निष्कासित रिक्त इमारती पाडून त्या ठिकाणी विक्रीयोग्य सदनिका (Saleble Component) बांधण्याचे प्रस्तावित असल्याचे श्री. आव्हाड यांनी सांगितले. या प्रकल्पातील प्लॉट ब मधील सर्वेक्षणास काही स्थानिक रहिवाशांच्या विरोधामुळे सर्वेक्षण होऊ शकले नाही. या रहिवाशांच्या मागण्यांबाबत योग्य तो विचार शासनातर्फे केला जाईल. रहिवाशांचे प्रकल्पाच्या बाजूने सकारात्मक मतपरिवर्तन झाले असून सदर प्रकल्प मार्गी लागण्यातील अडचणी दूर झाल्या आहेत, असे श्री. आव्हाड यांनी सांगितले. प्लॉट अ मधील चाळ क्रमांक १ अ, २ अ, १४ अ, १८ अ, १९ अ या ५ चाळींतील रहिवाशांचे सर्वेक्षण करण्यात आले असून लाभार्थ्यांची अंतिम पात्रता यादी (३२५ पात्र) प्रसिद्ध करण्यात आली आहे.

नायगाव बीडीडी चाळीमध्ये तळ अधिक ३ मजल्यांच्या ४२ चाळी अस्तित्वात असून त्यामध्ये एकूण ३ हजार ३४४ रहिवासी वास्तव्यास आहेत. सदर प्रकल्पाकरिता वास्तूशास्त्रज्ञ सल्लागार व प्रकल्पाचे समंत्रक म्हणून मे. संदीप शिक्रे अँड असोसिएट्स यांची नियुक्ती केली आहे. तसेच प्रकल्पाचे कंत्राटदार म्हणून मे. एल. अँड टी. कन्स्ट्रक्शन कंपनी लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्लॉट अ मधील चाळ क्रमांक १ अ, १८ अ, १९ अ मधील २२२ पात्र लाभार्थ्यांबाबत कायमस्वरूपी गाळ्याचा क्रमांक संगणकीकृत आज्ञावलीच्या माध्यमातून निश्चित करण्यात आला आहे. ज्या लाभार्थ्यांची पात्रता अद्याप संचालक, बीडीडी यांच्याकडून निश्चित करण्यात आलेली नाही त्या लाभार्थ्यांच्या नावाऐवजी तात्पुरत्या स्वरूपात संचालक, बीडीडी यांच्या नावाची नोंदणी करून गाळेवाटप करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पामध्ये ३ बेसमेंट + स्टील्ट + २२ मजल्यांच्या पुनर्वसन इमारती बांधण्यात येणार आहेत. पुनर्विकासाच्या प्रकल्प अभिन्यासास व पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील इमारतींच्या बांधकामांच्या नकाशांना म्हाडाच्या नियोजन प्राधिकरण कक्षाने मंजुरी दिली आहे.

यावेळी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री. मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत धात्रक आदी उपस्थित होते.

(सही /-)
मुख्य जनसंपर्क अधिकारी/म्हाडा


BDD
PC


KOMAT




BDD CHAWL REDEVELOPEMENT AT NAIGAON


BDD
KOMATSU


SUPERIMPOSED PLAN